आरोग्य विज्ञानाच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून सुट देणेबाबत

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

## शासन निर्णय, क्र.सीईटी-१२१५/ प्र.क्र.४११/१५/शिक्षण-२

गो.ते. रुग्णालय आवार इमारत, ९ वा मजला,

नवीन मंत्रालय, मुंबई- ४०० ००१.

दिनांक :१४ डिसेंबर, २०१५.

**संदर्भ** : शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. २५२/तांशि-४, दि. ३/१२/२०१५

**प्रस्तावना** :-राज्यातील विनाअनुदानित खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील कलम २ (द) , ३(१) व ३(२) मधील तरतूदीस अनुसरुनसंदर्भाधीन शासन अधिसूचनेद्वारे आरोग्य विज्ञानाचे व्यावसायिक अभ्यासक्रम घोषित करण्यात आले आहेत. तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम १० नुसार या व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश हे आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेमार्फत घेण्यात येणा-या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत करणे आवश्यक आहे. तथापि, सदर अधिनियमातील कलम ४(क) च्या परंतुकानुसार ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना राज्यसामाईक प्रवेश परीक्षेतून सूट द्यावयाची आहे, त्याबाबत शासनामार्फत आदेश निर्गमित करण्याची तरतूद विषद करण्यात आली आहे. सदर तरतूदीनुसार आरोग्य विज्ञानाच्या ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून सूट देणे आवश्यक आहे, त्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय** :- महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शिक्षण शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील कलम २ (द), ३(१) व ३(२ )नुसार आरोग्य विज्ञानाचे व्यावसायिक अभ्यासक्रम हे संदर्भाधीन दिनांक ०३.१२.२०१५रोजीच्या अधिसूचनेन्वये घोषित करण्यात आले आहेत. उक्त कायदयाच्या कलम ४ (क) मधील परंतुकानुसार सोबत जोडलेल्या

परिशिष्ट"अ"मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून वगळण्यास शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून सुट दिलेल्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेशाची कार्यपध्दती ही परिशिष्ट "अ"मध्ये संबंधित अभ्यासक्रमासमोर नमूद केल्यानुसार राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

१४।१२।१५

(अजित सासुलकर )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय ,मुंबई.
मा. मंत्री (वै.शि.) यांचे खासगी सचिव, मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई.
आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,वांद्रे,मुंबई.
उप सचिव (वैसेवा)वै.शि.व औ. विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
कार्यलयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती व शिक्षण शुल्क समिती, महाराष्ट्रराज्य, मुंबई.
अधिष्ठाता, सर्व शासकीय व खासगी वैद्यकीय,आयुर्वेद,होमिओपॅथी,नर्सिंग महाविद्यालये.
कक्ष अधिकारी (शिक्षण-१) वै.शि.व औ. विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती.

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय, क्र.सीईटी- १२१५/ प्र.क्र.४११/१५/शिक्षण-२, दिनांक १४ डिसेंबर,२०१५.सोबतचे परिशिष्ट.**

**परिशिष्ट-अ**

| अ.क्र. | राज्य सामाईक प्रवेश परीक्षेतून सूट दिलेले अभ्यासक्रम | सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची कार्यपध्दती |
|---|---|---|
| ०१. | एम.एस्सी (नर्सिग) | सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश हे संस्था स्तरावर भारतीय परिचर्या परिषदेने उक्त अभ्यासक्रमांच्या प्रवेशाकरितावेळोवेळी निश्चित केलेल्या किमान निकषांची पुर्तता करणा-या उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार करण्यात यावेत. याकरिता संस्थेत सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता उपलब्ध असणाऱ्या जागांबाबत मोठया प्रमाणात व जास्त खपाच्या वर्तमानपत्रात तसेच संबधित महाविद्यालयांच्या, आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या संकेतस्थळांवर जाहिरात देण्यात यावी व गुणवत्ता यादी तयार करुन प्रवेश देण्यात यावेत. |